क्र. १३४ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

१९ मार्च २०२३

## प्रायश्चित्तकाळातील चौथा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानातील जन्मांध असलेल्या माणसाचा त्याच्या पापाशी किंवा आईवडिलांच्या पापाशी काहीच संबंध नाही. असे स्पष्ट करून प्रभू येशूने चमत्काराद्वारे देवाचा गौरव करून त्याच्याठायी असलेले दैवी सामर्थ्य प्रकट केले. येशू म्हणतो, ''मी ह्या जगात आलो आहे. ज्यांना दिसत नाही त्यांना दिसावे.'' आपल्या जीवनातील अंध:कार नाहीसा व्हावा आणि ख्रिस्ताच्या तारणदायी प्रकाशाने आपणास नवी दृष्टी प्राप्त व्हावी म्हणून पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे शांतीस्वरूप बापा, तुझा पुत्र येशू ख्रिस्त आम्हाला आनंदित करतो. त्याने तुझ्याशी आमचा समेट घडवून आणला. श्रध्देने व भक्तिभावाने पुनरुत्थानसणाकडे वाटचाल करण्यास आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**एक शमुवेल या पुस्तकातून घेतलेले वाचन** १६: १.६–७, १०–१३

**''इस्राएलचा राजा म्हणून दाविदचा अभिषेक होतो.''**

परमेश्वराने शमुवेलला म्हटले, ''शिंगात तेल भरून चल. मी तुला इशाय बेथलेहेमकर याच्याकडे पाठवतो; कारण मी त्याच्या एका पुत्रास माझ्याकरिता राजा निवडले आहे.''

ते आले तेव्हा त्याने अलियाबला न्याहाळून पाहून म्हटले, ''परमेश्वरासमोर आलेला हाच परमेश्वराचा अभिषिक्त होय.'' पण परमेश्वराने शमुवेलला म्हटले, ''तू त्याच्या स्वरूपावर अथवा शरीराच्या उंचीकडे पाहू नकोस. कारण मी त्याला नापसंत केले आहे. परमेश्वराचे मानवासारखे पाहणे नसते. मानव बाह्य स्वरूप पाहतो पण परमेश्वर हृदय पाहतो.'' याप्रकारे इशायने आपले सात पत्र शमुवेलपुढे सादर केले. शमुवेलने इशायला म्हटले, ''यातला कोणीही परमेश्वराने पसंत केला नाही?'' शमुवेलने इशायला विचारले, ''तुझे सर्व पुत्र हजर आहेत काय?'' तो म्हणाला, ''एक सर्वात धाकटा राहिला आहे. तो मेंढरे राखत आहे.'' तेव्हा शमुवेल इशायला म्हणाला, ''त्याला बोलावून आण. तो येईपर्यंत आम्ही भोजनास बसणार नाही.'' त्याने त्यांस बोलावणे पाठवून आणले. त्याचा वर्ण तांबूस, डोळे सुंदर व स्वरुप मनोहर होते. तेव्हा परमेश्वराने त्यास म्हटले, ''ऊठ, त्यास अभिषेक र; हाच तो आहे.'' मग शमुवेलने तेलाचे शिंग हाती घेऊन त्याच्या भावांसमोर त्यांस अभिषेक केला आणि त्या दिवसापासून पुढे परमेश्वराचा आत्मा दाविदच्याठायी जोराने संचारू लागला.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

२३:१–३, ३–४, ५, ६

प्रतिसाद : **परमेश्वर माझा मेंढपाळ आहे.**

१. परमेश्वर माझा मेंढपाळ आहे. मला काही उणे पडणार नाही. तो मला हिरव्यागार कुरणात बसवतो. तो मला शांत पाण्याजवळ नेतो. तो माझा जीव ताजातवाना करतो.

२. तो आपल्या नामास्तव मला नीतिमार्गांनी चालवतो, मृत्युच्छायेच्या दरीतूनही मी जात असलो तरी मी अरिष्टास भिणार नाही. कारण तो माझ्याबरोबर आहे. त्याची आकडी व त्याची काठी मला धीर देतात.

३. तो माझ्या शत्रूच्या देखत माझ्यापुढे ताट वाढतो. तो माझ्या डोक्याला तेलाचा अभ्यंग करतोस. माझे पात्र काठोकाठ भरले आहे.

४. खरोखर माझ्या आयुष्याचे सर्व दिवस मला कल्याण व दया लाभेल. परमेश्वराच्या घरात मी चिरकाल राहीन.

### दुसरे वाचन

**पौलचे इफिसकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ५:८–१४**

**''मेलेल्यातून ऊठ, म्हणजे ख्रिस्ताचा प्रकाश तुझ्यावर पडेल.''**

बंधूजनहो, पूर्वी तुम्ही अंध:कार असे होता पण आता तुम्ही प्रभूमध्ये प्रकाश असे आहा.प्रकाशाच्या प्रजेप्रमाणे चाला. कारण प्रकाशाचे फळ सर्व प्रकारचे चांगुलपण, नीतिमत्त्व व सत्यता ह्यात दिसून येते. प्रभूला काय संतोषकारक आहे हे पारखून घेत जा. अंधाराच्या निष्फळ कर्माचे भागीदार होऊ नका, तर उलट त्यांचा निषेध करा. कारण त्या लोकांच्या हातून जी कर्मे गुप्तपणे होतात त्याचा उच्चार करणे देखील लज्जास्पद आहे. सर्व निषेधलेल्या गोष्टी उजेडाकडून उघड होतात, कारण जे काही उघड होते ते प्रकाश आहे म्हणून असे म्हटले आहे,

''हे निद्रिस्ता, जागा हो व मेलेल्यांतून ऊठ,
म्हणजे ख्रिस्त तुझ्यावर प्रकाश पाडील.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान ८:१२**

प्रभू म्हणतो, मी जगाचा प्रकाश आहे. जो मला अनुसरतो त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील.

### शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ९: १–४१**

**''त्याने डोळे धुतले आणि त्यास दृष्टी मिळाली.''**

*(येशू तिकडून जात असता एक जन्मांध माणूस त्याच्या दृष्टीस पडला.) तेव्हा त्याच्या शिष्यांनी त्याला विचारले, ''गुरुजी, कोणाच्या पापामुळे हा आंधळा जन्मास आला? ह्याच्या की ह्याच्या आईबापाच्या?'' येशूने उत्तर दिले, ''ह्याने किंवा ह्याच्या आईबापांनी पाप केले असे नाही, तर ह्याच्याठायी देवाची कार्ये प्रगट व्हावी म्हणून हा असा जन्माला आला. ज्याने मला पाठवले त्याची कार्ये दिवस आहे तोपर्यंत आपल्याला केली पाहिजेत. रात्र येणार आहे. तिच्यात कोणालाही काम करता येणार नाही. मी जगात आहे तोपर्यंत मी जगाचा प्रकाश आहे.'' असे बोलून (येशू भूमीवर थुंकला. थुंकीने त्याने चिखल केला. तो चिखल त्याच्या डोळ्यांस लावला व त्याला म्हटले, ''जा शिलोह (म्हणजे पाठवलेला) नावाच्या तळ्यात धू.'' मग त्याने जाऊन धुतले व तो डोळस होऊन आला. ह्यावरून शेजारीपाजारी व ज्यांनी त्याला पूर्वी भिक्षा मागताना पाहिले होते ते म्हणाले, ''भीक मागत बसणारा तो हाच नाही काय?'' कित्येक म्हणाले, ''तोच हा.'' दुसरे म्हणाले, ''नाही, हा त्याच्यासारखा आहे.'' तो म्हणाला, ''मी तोच आहे.'' ह्यावरून ते त्याला म्हणाले, ''तुझे डोळे कसे उघडले?'' त्याने उत्तर दिले, ''येशू नावाच्या मनुष्याने चिखल करून माझ्या डोळ्यास लावला आणि मला सांगितले, शिलोहवर जाऊन धू; मी जाऊन धुतले आणि मला दृष्टी आली.'' तेव्हा त्यांनी त्याला म्हटले, ''तो कोठे आहे?'' तो म्हणाला, ''मला ठाऊक नाही.''

(मग जो पूर्वी आंधळा होता त्याला त्यांनी परुश्यांकडे नेले. ज्या दिवशी येशूने चिखल करुन त्याचे डोळे उघडले तो दिवस शब्बाथ होता. ह्यास्तव परुश्यांनीही त्याला पुन्हा विचारले, ''तुला दृष्टी कशी आली?'' तो त्यांना म्हणाला, ''त्याने माझ्या डोळ्यांस चिखल लावला, तो मी धुऊन टाकल्यावर मला दिसू लागले.'' ह्यावरून परुश्यांतील कित्येक म्हणाले, ''हा मनुष्य देवाकडचा नाही. कारण तो शब्बाथ पाळीत नाही.'' दुसरे म्हणाले, पापी मनुष्य अशी चिन्हे कशी करु शकतो?'' आणि त्यांच्यामध्ये फुट पडली म्हणून पुन्हा ते त्या आंधळ्याला म्हणाले, ''त्याने तुझे डोळे उघडले तर त्याच्याविषयी तू काय

म्हणतोस?'' त्याने म्हटले, ''तो संदेष्टा आहे.'')

यहुद्यांनी त्या दृष्टी प्राप्त झालेल्या माणसाच्या आईवडिलांना बोलावून विचारपूस करीपर्यंत तो पूर्वी आंधळा होता व आता डोळस आहे, हे खरे मानले नाही. त्यांनी त्यांना विचारले, ''तुमचा जो मुलगा अंधळा जन्मला असे म्हणता तो हाच काय? तर आता त्याला दृष्टी कशी लाभली?'' त्याच्या आईवडिलांनी उत्तर दिले, ''हा आमचा मुलगा आहे व तो आंधळा जन्मला हे आम्हांला ठाऊक आहे. तरी आता त्याला दृष्टी कशी मिळाली हे आम्हांला ठाऊक नाही किंवा त्याचे डोळे कोणी उघडले हेही आम्हांला ठाऊक नाही. त्याला विचारा, तो वयात आलेला आहे. तो स्वत:विषयी सांगेल. ''त्याच्या आईवडिलांना यहुद्यांचे भय होते म्हणून ते तसे म्हणाले, कारण हा ख्रिस्त आहे. असे कोणी पत्करल्यास त्याला सभाबहिष्कृत करावे असे यहुद्यांचे अगोदरच एकमत झाले होते. यामुळे त्याच्या आईवडिलांनी म्हटले, ''तो वयात आलेला आहे, त्याला विचारा.''

मग जो मनुष्य पूर्वी आंधळा होता त्याला त्यांनी दुसऱ्यांदा बोलावून म्हटले, ''देवाचा गौरव कर, तो मनुष्य पापी आहे हे आम्हांला ठाऊक आहे.'' यावरून त्याने उत्तर दिले, तो पापी आहे किंवा नाही. मात्र मला एक गोष्ट ठाऊक आहे की, मी पूर्वी आंधळा होतो व आता मला दिसते. ''यावर त्यांनी त्याला म्हटले, ''त्याने काय केले? त्याने तुझे डोळे कसे उघडले?'' त्याने त्याला उत्तर दिले, ''आताच मी तुम्हांस सांगितले ते तुम्ही ऐकले नाही? पुन्हा ऐकावयाची इच्छा का करता? तुम्हीही त्याचे शिष्य होऊ इच्छिता काय?'' तेव्हा त्यांनी त्यांची हेटाळणी करून म्हटले, ''तू त्याचा शिष्य आहेस, आम्ही मोशेचे शिष्य आहो. देव मोशेबरोबर बोलला आहे. हे आम्हांला ठाऊक आहे. हा कोठला आहे हे आम्हांला ठाऊक नाही.'' त्या माणसाने त्यांना उत्तर दिले, ''हेच तर मोठे आश्चर्य आहे की, तो कोठला आहे हे तुम्हांला ठाऊक नाही; पण त्याने तर माझे डोळे उघडले! आम्हांला ठाऊक आहे की, देव पापी लोकांचे ऐकत नाही तर जो कोणी देवाचा भक्त असून त्याच्या इच्छेप्रमाणे वागतो तो त्याचे ऐकतो. जन्मांधाचे डोळे कोणी उघडल्याचे युगाच्या आरंभापासून कधी ऐकण्यात आले नव्हते. हा देवाकडचा नसता तर याला काहीच करता आले नसते.'' (त्यांनी त्याला म्हटले, ''तू सर्वस्वी पापात जन्मलास आणि आम्हांला धडे शिकवतोस काय?'' मग त्यांनी त्याला बाहेर घालवले.

त्यांनी त्याला बाहेर घालवले हे येशूने ऐकले आणि त्याला तो भेटल्यावर तो त्याला म्हणाला, ''तू मनुष्याच्या पुत्रावर विश्वास ठेवतोस काय?'' त्याने उत्तर दिले, ''महाराज, मी त्याच्यावर विश्वास ठेवावा असा तो कोण आहे?'' येशूने त्याला म्हटले, ''तू त्याला पाहिले आहे व तुझ्याबरोबर आता बोलत आहे तोच तो आहे.'' तो म्हणाला, ''प्रभूजी मी विश्वास ठेवतो'' आणि त्याने त्याला नमन केले.) तेव्हा येशू म्हणाला, ''मी न्यायनिवाड्यासाठी ह्या जगात आलो आहे. ज्यांना दिसत नाही त्यांना दिसावे आणि ज्यांना दिसते त्यांनी आंधळे व्हावे.'' परुश्यांनी जे त्याच्याजवळ होते त्यांनी हे ऐकून त्याला म्हटले, ''आम्हीही आंधळे आहोत काय?'' येशू त्यांना म्हणाला, ''तुम्ही आंधळे असता तर तुम्हांला पाप नाही. परंतु आम्हांला दिसते असे तुम्ही आता म्हणता, म्हणून तुमचे पाप तसेच राहते.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आम्हांला सदैव प्रार्थना करण्याची गरज आहे आणि विशेषत: या प्रायश्चित्तकाळात तर अधिक प्रार्थना करण्याची गरज आहे : ख्रिस्तासह एकनिष्ठेने आम्ही जागृत राहायला हवे आणि आमच्या स्वर्गीय पित्याकडे प्रार्थना करायला हवी.

प्रतिसाद : **ऐकावी प्रार्थना करितो मी याचना.**

१. अखिल जगातील सर्व ख्रिस्ती लोकांवर ख्रिस्ताचा प्रकाश येण्यास व त्यांना जीवनाचा खरा अर्थ समजवण्यास परमेश्वराचे सामर्थ्य पोप, कार्डिनल्स, बिशप्स, फादर्स व सिस्टर्स ह्यांना लाभावे म्हणून प्रार्थना करूया.

२. जे लोक अन्याय, अत्याचार व भ्रष्टाचाराखाली चिरडले जात आहेत, अशा लोकांना परमेश्वराच्या करुणेचा स्पर्श होऊन त्यांचे सांत्वन व्हावे म्हणून परमेश्वराकडे प्रार्थना करूया.

३. गैरसमज व संशयामुळे आपल्या घरात कुटुंबात व गावात विघ्न निर्माण झाले असेल तर ते नाहीसे व्हावे म्हणून आपण परमेश्वराकडे प्रार्थना करूया

४. आता थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

## समारोप

हे प्रभो, तुझे लोक पुन्हा तुझ्याकडे येवोत आणि संपूर्ण अंत:करणाने ते तुझी सेवा करात. श्रध्देने आम्ही तुझ्या साहाय्याची याचना केली आहे. आता आमच्या पापांचा त्याग करावा म्हणून, आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, शांती व आनंदाचे प्रतीक म्हणून ही दाने आम्ही तुला अर्पण करीत आहोत. या ख्रिस्तबलिदानामुळे आमची तुझ्यावरील भक्ती वाढव व जगाला मुक्तीचे वरदान दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे परमेश्वरा, या जगात येणाऱ्या सर्वांना तू सुबुध्दी देतोस. तुझ्या शुभवृत्ताच्या ज्ञानाने आमची मने भरून टाक. आमचे विचार तुला संतुष्ट करणारे बनू देत व आमच्या भक्तीत प्रामाणिकपणा येऊ दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभुख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

आजच्या उपासनेतील वाचने आपल्याला अंधारातून प्रकाशात घेण्याचे आमंत्रण देत आहेत. आजच्या पहिल्या वाचनात (१ शमुवेल १६:१ब, ६-७, १०-१३ अ) इस्राएलचा पहिला राजा शौल परमेश्वराच्या प्रकाशापासून दूर गेल्यामुळे दुष्टतेच्या अंधारात निघून जातो. त्याच्या जागी अभिषिक्त होणारा दावीद परमेश्वराच्या प्रकाशाचे द्योतक बनतो. दुसऱ्या वाचनात (इफिस.५:८-१४) संत पौल इफिसकरांना पापांच्या अंधारातून ख्रिस्ताच्या प्रकाशात चालण्यासाठी आवाहन करतो. जन्मांधाला डोळे देणे (योहान ९:१-४१) ह्या प्रसंगातून संत योहान शुभवर्तमानकार आपल्यासमोर प्रकाशाची तीन माध्यमे सादर करतो.

**अ) प्रभूशब्दाचा प्रकाश :** येशूने आंधळ्याला शिलोह नावाच्या तळ्यावर जाऊन आपले डोळे धुवायला सांगितले. तो जरी आंधळा असला तरी आपल्या कानांनी त्याने येशूचा शब्द ऐकला. त्याच्यासाठी प्रभूचा शब्द त्याच्या मार्गावरील प्रकाश आणि त्याच्या पावलांकरिता दिवा बनला. आपण जरी प्रभूच्या आज्ञांच्या अज्ञानरूपी अंधारात जन्मलेले असलो तरी प्रभूशब्दाच्या प्रकाशात चालून तारणप्राप्ती करून घेऊ शकतो.

**ब) ईश्वर अनुभवाचा प्रकाश :** आंधळा डोळस झाल्यानंतर त्याला असंख्य प्रश्नांना सामोरे जावे लागले. शेजाऱ्यांनी प्रश्न विचारून त्याला भंडावून सोडले, आईवडिलांनी यहुद्यांच्या भीतीमुळे त्याला एकटे सोडून दिले. यहुदी अधिकाऱ्यांनी त्याला सभास्थानातून बाहेर घालवून दिले. अशा ह्या प्रतिकूल परिस्थितीत तो जन्मांध आपल्या जीवनाची साक्ष देतच राहिला कारण त्याने ईश्वरी स्पर्शाचा वैयक्तिक अनुभव घेतलेला होता.

**क) श्रध्देचा प्रकाश :** हे सर्व होईपर्यंत येशू नक्की कोण आहे ते त्याला ठाऊक नव्हते. पुढे येशू त्याला भेटल्यावर आपणच तो 'मनुष्याचा पुत्र' आहोत असे आत्मप्रकटीकरण त्याला करतो, आता त्याला केवळ भौतिक प्रकाश नव्हे तर आध्यात्मिक प्रकाश लाभतो. तो नमन करून येशूला 'प्रभूजी' म्हणून स्वीकारतो. मात्र बुध्दीच्या प्रकाशात वावरणाऱ्या यहुदी अधिकाऱ्यांच्या वाटेला अश्रध्देच्या अंधारात ठेचाळत राहण्याचे दुर्भाग्य येते.

**आत्मपरीक्षण :** जीवनातील कोणकोणत्या प्रकारच्या अंधारावर मी मात करायला हवी असे मला वाटते?

●●●

| मार्च २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | चौथा सप्ताह |
|---|---|---|
| सोम २० | मरीयेचा पती सं योसेफ (पां) | :२ शमुवेल ७:४-१६/रोम.४:१३,१६-१८,२२/मत्तय १:१६,१८-२१,२४ |
| मंगळ २१ | सं निकोलस डी फ्लू (जां) | : यहेज्केल ४७:१-९, १२/योहान ५:१-१६ |
| बुध २२ | ट्रेंटचे सं सायमन व नॉर्वीचचे सं विल्यम (जां) | : यशया ४९:८-१५/योहान ५: १७-३० |
| गुरू २३ | सं तुरिबियुस डी मोग्रोवेजा (जां) | : निर्गम ३२:७-१४/योहान ५:३१-४७ |
| शुक्र २४ | स्वीडनच्या सं कॅथरीन (जां) | : प्रज्ञा २:१, १२-२२/योहान ७:१-२, १०, २५-३० |
| शनि २५ | दूताचा मरीयेला संदेश (जीवन रक्षक दिन) (जां) | : यिर्मया ११:१८-२०/योहान ७:४०-५२ |